ePaper
| वर्ष - 6 । अंक - 153 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | सोमवार । दिनांक 12 सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# आमचा पक्ष दिल्लीपुढे कधीही झुकणार नाही; शरद पवार



**आतील पानांत**

- पुण्यात धुवाधार पाऊस
- शिरुर मतदार संघात २०२४ मध्ये भाजपाचा विजय निश्चित!
- अर्थविषयक सामाईक समज!

## मावळात शिंदे गटाचे 'श्रीरंग'!

# शिरुरला आढळरावांच्या हाती 'कमळ'?

## भाजपाचा संभाव्य फॉर्म्यूला : लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरु

। पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशाच्या राजकीय पटलावर २०२४ ची लोकसभा निवडणूक अत्यंत निर्णायक होणार असून, भाजपाविरोधी सर्व विरोधक एकवटणार आहेत. त्यामुळे केंद्रीय पातळीवर भाजपाकडून सतर्कता बाळगत देशातील १४४ लोकसभा मतदार संघात प्रवास योजनेची घोषणा केली आहे. त्याअंतर्गत भाजपाची ताकद तुलनेत कमी असलेल्या मतदार संघांवर 'फोकस' करण्यात आले आहे.**



महाराष्ट्रातील एकूण ४८ पैकी १६ लोकसभा मतदार संघ भाजपाने 'टार्गेट' केले असून, त्यामध्ये पुणे जिल्ह्यातील बारामती आणि शिरुर लोकसभा मतदार संघाचा समावेश आहे.

मावळ लोकसभा मतदार संघाचे शिवसेना खासदार (शिंदे गट) श्रीरंग बारणे यांच्या मतदार संघाचा भाजपाच्या लोकसभा प्रवास योजनेत समावेश नाही. त्यामुळे बारणे यांना शिंदे गटातून नियोजित भाजपा-शिवसेना (शिंदे गट) महायुतीची उमेदवारी निश्चित मानली जाते. त्यामुळे महाविकास आघाडीचे संभाव्य उमेदवार पार्थ पवार विरुद्ध बारणे असा सामना पुन्हा पहायला मिळेल, असे राजकीय जाणकारांचे म्हणणे आहे.

शिरुर लोकसभा मतदार संघात भाजपाने लक्ष केंद्रीत केले असून, निवडणूक प्रभारी म्हणून भाजपाच्या कट्टर निष्ठावंत व पर्वती मतदार संघाच्या आमदार माधुरी मिसाळ यांच्याकडे जबाबदारी सोपवली आहे. संयोजकपदी अॅड. धर्मेंद्र खंडारे कार्यरत आहेत. मतदार संघाचे माजी खासदार आणि शिवसेना नेते शिवाजीराव आढळराव पाटील यांनी शिंदे गटाला साथ दिली आहे. विद्यमान खासदार राष्ट्रवादीचे अमोल कोल्हे यांना आव्हान देण्यासाठी भाजपाने कंबर कसली आहे. आता भाजपाने दीड वर्षे अगोदरच मतदार संघातील निवडणुकीची तयारी सुरू केल्यामुळे उमेदवारीसाठी भाजपाचा 'क्लेम' राहणार हे निश्चित मानले जाते. त्यामुळे भाजपाच्या कमळाच्या तिकीटावर शिवाजीराव आढळराव यांना संधी देण्यात येईल. त्याद्वारे 'उमेदवार तुमचा आणि चिन्ह आमचे' या सूत्राने भाजपा व शिंदे गटात समझोता होईल, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

> पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात विकासाची वाटचाल सुरू असून, २०२४ मध्ये शिरुर लोकसभा मतदार संघात निश्चितपणे भाजपाचा उमेदवार निवडणून येणार आहे. संघटनात्मक बांधणीमुळेच भाजपाने यशस्वी वाटचाल ठेवली आहे. आगामी दीड वर्षांत शिरुर लोकसभा मतदार संघातील प्रलंबित प्रश्न केंद्रापर्यंत पोहोचवून मार्गी लावण्यासाठी आम्ही पाठपुरावा करणार आहोत.
>
> **- माधुरी मिसाळ, निवडणूक प्रभारी, शिरुर लोकसभा.**

### लोकसभा निवडणुकीचा शंखनाद...

लोकसभा निवडणुकीला अद्याप दीड वर्षांचा अवधी असला तरी, भाजपाकडून लोकसभा प्रवास योजना सुरू करुन रणशिंग फुंकल्याचे मानले जाते. दुसरीकडे, राष्ट्रीय काँग्रेसकडून राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली 'भारत जोडो' आंदोलन सुरू करुन भाजपाला आव्हान दिले जात आहे. तसेच, राष्ट्रवादीच्या वतीने नवी दिल्ली येथे राष्ट्रीय अधिवेशन घेत निवडणुकीचा शंखनाद केल्याचे मानले जात आहे.

# निर्धारित कालावधीत प्रकल्प पूर्ण करा!

## आयुक्त शेखर सिंह यांच्या सूचना : इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटरला भेट

पिंपरी ।।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत शहरांमध्ये उभारण्यात आलेल्या इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल (ICCC) सेंटरला प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी शेखर सिंह यांनी भेट देवून संपूर्ण प्रकल्पांची पाहणी केली. तसेच, केंद्र शासनाने दिलेल्या कालावधीत संपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्याबाबतच्या सूचना संबंधितांना दिल्या.. पिंपरी चिंचवड महापालिकेचा पदभार स्विकारल्यानंतर आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी अस्तित्त मॉल, निगडी येथील कमांड अँड कंट्रोल सेंटरला दि. १० रोजी प्रथमच भेट दिली. यावेळी संपूर्ण इमारत व परिसराची देखील पाहणी केली. याप्रसंगी, स्मार्ट सिटीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, शहर अभियंता तथा सह मुख्य कार्यकारी अधिकारी (एबीडी) मकरंद निकम, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, सह शहर अभियंता संजय खाबडे, कार्यकारी अभियंता मनोज सेठीया, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे यांच्यासह प्रकल्प सल्लागार प्रतिनिधी आदी उपस्थित होते.



कमांड आणि कंट्रोल सेंटर हे आपत्तींचे व्यवस्थापन, शहरातील विविध ऑपरेशन्ससाठीचे केंद्र आहे. सदर प्रकल्प "अ" क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रायोगिक तत्वावर कार्यान्वित करण्यात आला आहे. आयसीटीच्या पायाभूत सुविधांमध्ये डेटा सेंटर, क्लाऊड, नेटवर्क, सुरक्षा आणि शहरातील विविध सेवांशी जोडले जाण्यासाठी आवश्यक असणारे हार्डवेअर, नागरिक केंद्री सेवा, स्मार्ट सिटी अॅप्स आणि वेब पोर्टल, स्मार्ट सुविधा आणि माहिती देणारे इन्फॉर्मेशन डिस्प्ले, त्याचबरोबर पायाभूत सुविधांमध्ये ऑप्टीकल फायबर, वाय फाय, वायर्ड बस, वायरलेस सेन्सर नेटवर्क्स, लॉग टर्म इव्होल्युशन नेटवर्क उभारण्यात येत आहे.कमांड अँड कंट्रोल सेंटरच्या साहाय्याने स्मार्ट पर्यावरण व्यवस्थापन, स्मार्ट वाहनतळ व्यवस्थापन, स्मार्ट वाहतूक व्यवस्थापन, स्मार्ट जल व्यवस्थापन, स्मार्ट समुदायांचे व्यवस्थापन, स्मार्ट महानगरपालिका व्यवस्थापन, स्मार्ट परिवहन व्यवस्थापन इत्यादी घटकांशी संपर्क स्थापित करून त्यांचे मूल्यमापन करणे शक्य असून संपूर्ण कामकाजाचे तटस्थतेने निरीक्षण केले जाणार आहे.

# पुण्यात धुवाँधार पाऊस!

## रस्त्यांवर पाण्याचे लोंढे ; अंबिल ओढा परिसरात पुन्हा पूरसदृश्य स्थिती

। पुणे। महाईन्यूज ।



पुणे शहर आणि परिसरामध्ये रविवारी संध्याकाळी पाचच्या सुमारास झालेल्या धुवाधार पावसाने शहरात अक्षरशः धुमाकूळ घातला. रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर पाण्याचे लोंढे आले, तर अंबिल ओढा परिसरात पुन्हा पूरसदृश्य स्थिती निर्माण झाली. अनेक नागरिकांच्या घरात पाणी शिरण्याचे प्रकार घडले. यापूर्वी अंबिल ओढा भागांत २५ सप्टेंबर २०१९ मध्ये महापूर येऊन हाहाकार निर्माण झाला होता. पुणे शहर आणि परिसरामध्ये रविवारी दुपारपर्यंत आकाश निरभ्र होते. मात्र, चारनंतर आकाशात ढग निर्माण झाले. त्यानंतर तासभरात मुसळधार पावसाला सुरुवात झाली. सुमारे एक तास जोरदार पाऊस झाला. त्यामुळे काही वेळातच रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर पाणी जमा झाले. त्यामुळे वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. नागरिकांनी मिळेल त्या ठिकाणी आसरा घेतला होता. पावसाचा जोर कमी झाल्यानंतरही रस्त्यावरून पाण्याचे लोंढे वाहत होते. या पाण्यातून वाहने बाहेर काढणेही कठीण झाले होते. अंबिल ओढ्याच्या परिसरात अनेक घरांमध्ये पाणी शिरण्याचे प्रकार घडले. इंदिरानगर भागातील रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर पाण्याचे लोट आल्याने दुचाकीसारखी वाहने वाहून जाण्याची स्थिती निर्माण झाली होती. या भागात अंकुश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी नागरिकांना मदत केली. काहींची वाहने पाण्याच्या लोंढ्यातून बाहेर काढली, तर ज्येष्ठांना पाण्यातून पुढे जाण्यास मदत केली.

रात्री पर्वती, धनकवडी, के. के. मार्केट परिसर, इंदिरानगर, चंदननगर पोलीस स्थानक, कोथरूडमधील वेधभवन, वनाज, पाषाण, बी. टी. कवडे रस्ता, सोमेश्वरवाडी, वानवडी, कात्रज उद्यान आदी भागांत पाणी शिरण्याचे प्रकार घडले. अंबिल ओढा भागामध्ये २५ सप्टेंबर २०१९ मध्ये महापूर आला होता.

# नागरिकांच्या कराचे दीड कोटी पाण्यात!

## फिरत्या हौदांमध्ये 13 टक्के मूर्तींचे विसर्जन

। पुणे। महाईन्यूज ।



गणेशोत्सवासाठी महापालिका प्रशासनाने दीड कोटी रुपये खर्च करून दीडशे फिरते हौद घेतले मात्र त्यामध्ये केवळ तेरा टक्के मूर्तींचे विसर्जन झाल्याची वस्तुस्थिती पुढे आली आहे. त्यामुळे आयुक्तांनी अट्टहास करून घेतलेला हा निर्णय चुकीचा ठरल्याचे स्पष्ट झाले असून पुणेकरांच्या कराचा वाया गेलेला पैसा आयुक्त विक्रम कुमार आणि अन्य अधिकाऱ्यांच्या खिशातून वसूल करावा, अशी मागणी सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी केली आहे.

महापालिकेने गणेश विसर्जनासाठी शहरात विविध ठिकाणी तसेच घाटांवर ४६ बांधलेले हौद , ३५१ लोखंडी टाक्या , १९१ मूर्ती संकलन आणि दान केंद्रे अशी व्यवस्था केली होती आणि ती २०१९ पर्यंत पुरेशी ठरत होती. सन २०२० आणि २०२१ मध्ये टाळेबंदीमुळे या विसर्जन व्यवस्था उपलब्ध नव्हत्या म्हणून महापालिकेने ६० फिरते विसर्जन हौद संपूर्ण शहरासाठी भाडेकराराने घेतले होते. ही व्यवस्था पुरेशी ठरली होती.यावेळचा उत्सव निर्बंधमुक्त असल्याने आणि टाळेबंदी नसल्याने लोखंडी टाक्या पासून मूर्ती संकलन पर्यंत सर्व नियमित गणेश विसर्जन पर्याय उपलब्ध होते. मात्र त्यानंतरही आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी गणेशोत्सवाच्या कालावधीत दीडशे फिरते हौद भाडेकराराने घेण्याचा निर्णय घेतला होता. सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी या निर्णयाला आक्षेप घेतला होता. महापालिकेने उपलब्ध करून दिलेल्या आकडेवारीनुसार वेलणकर यांनी नोंदविलेला आक्षेप खरा ठरल्याचे स्पष्ट झाले आहे.

# नोकरीच्या आमिषाने तरुणाला ऑनलाइन गंडा

। पुणे । महाईन्यूज ।




**तरुणाच्या बँक खात्याची गोपनीय माहिती घेऊन चोरट्याने खात्यातून एक लाख २३ हजार रुपये लांबविले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तरुणाने पोलिसांकडे तक्रार अर्ज दिला. माहिती-तंत्रज्ञान कायदा तसेच फसवणूक केल्या प्रकरणी चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.**

नोकरीच्या आमिषाने चोरट्याने तरुणाला ऑनलाइन गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. चोरट्याने तरुणाच्या बँक खात्यातून एक लाख २३ हजारांची रोकड लांबविली. याबाबत एका तरुणाने कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार तरुण नोकरीच्या शोधात होता. त्याच्या मोबाइल क्रमांकावर चोरट्याने नोकरीचे आमिष दाखविणारा संदेश पाठविला होता. त्यानंतर चोरट्याने त्याला पुन्हा संदेश पाठविला. चोरट्याने दाखविलेल्या आमिषाला तरुण बळी पडला. त्यानंतर चोरट्याने कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी तातडीने पैसे जमा करावे लागेल, असे तरुणाला सांगितले. तरुणाच्या बँक खात्याची गोपनीय माहिती घेऊन चोरट्याने खात्यातून एक लाख २३ हजार रुपये लांबविले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तरुणाने पोलिसांकडे तक्रार अर्ज दिला. माहिती-तंत्रज्ञान कायदा तसेच फसवणूक केल्या प्रकरणी चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजय मोगले तपास करत आहेत.

# आरपीआयला पुण्यात हवे महापौर तर मुंबईत उपमहापौरपद : आठवले!

## एकनाथ शिंदे यांची सेना हीच खरी शिवसेना, उद्धव ठाकरे यांच्या चुकीमुळे शिवसेना फुटली

। लोणावळा । महाईन्यूज ।



मुंबई महापालिकेत उपमहापौर, तर अनुसूचित जातीसाठी पुण्याचे महापौरपद आरक्षित झाल्यास, ते रिपब्लिकन पक्षाला मिळावे, अशी आमची मागणी आहे, अशी भूमिका केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री आणि रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी लोणावळ्यात स्पष्ट केली. एकनाथ शिंदे यांची सेना हीच खरी शिवसेना आहे. उद्धव ठाकरे यांच्या चुकीमुळे शिवसेना फुटली आहे, असे मत व्यक्त करतानाच भाजप आणि रिपब्लिकन पक्षाच्या आघाडीमध्ये मनसेने बिघाडी करू नये, असेही ते म्हणाले. पक्ष कार्यकारिणीच्या बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत आठवले म्हणाले, की शिवसेना मोडकळीस आली आहे, तिची अवस्था दयनिय झाली आहे. काँग्रेस पक्ष दुबळा झाला आहे, तर राष्ट्रवादी पक्षाची मुंबईत ताकद कमी असल्याने मुंबई महानगरपालिकेवर यावेळी भाजप, आरपीआय व शिंदे गट सत्ता स्थापन करणार यात शंका नाही. मुंबई महानगरपालिकेतील शिवसेनेची सत्ता हिसकावून घेण्याचा आमचा प्रयत्न असून उपमहापौरपद आरपीआयला मिळावे, असा ठराव आज लोणावळ्यात पार पडलेल्या आरपीआयच्या राष्ट्रीय कार्यकारिणी बैठकीत करण्यात आला आला. उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस, राष्ट्रवादीसोबत महाविकास आघाडी केली नसती, तर आज शिवसेना फुटली नसती.

शिवसेना व शिंदे गटातील वादावर बोलताना आठवले म्हणाले, शिंदे गटाकडे बहुमत आहे. सर्वाधिक आमदार व खासदार त्यांच्यासोबत असल्याने धनुष्यबाण हे चिन्ह देखील त्यांनाच मिळावे. सोळा आमदारांच्या निलंबनाचा मुद्दा देखील चुकीचा आहे. खंडपीठ याबाबत योग्य निर्णय देईल याची खात्री आहे. दसरा मेळाव्यासाठी ताकदवान शिवसेना कोणाची हे पाहून परवानगी द्यावी, असा सल्ला मुंबई महानगरपालिकेला दिला.

# शिरुर मतदार संघात 2024 मध्ये भाजपाचा विजय निश्चित !

## केंद्रीय मंत्री रेणुका सिंग यांचा दौरा : लोकसभा निवडणूक प्रभारी माधुरी मिसाळ यांचा दावा





पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात विकासाची वाटचाल सुरू असून, २०२४ मध्ये शिरुर लोकसभा मतदार संघात निश्चितपणे भाजपाचा उमेदवार निवडणून येणार, असा विश्वास शिरुर लोकसभा निवडणूक प्रभारी व आमदार माधुरी मिसाळ यांनी व्यक्त केला.**

भारतीय जनता पार्टी लोकसभा प्रवास योजनेंतर्गत केंद्रीय मंत्री रेणुका सिंग शिरुर लोकसभा मतदार संघात तीन दिवस दौरा करणार आहेत. दि.१४, १५ आणि १६ सप्टेंबर २०२२ असे तीन दिवस संघटनात्मक व सार्वजनिक कार्यक्रम होणार आहेत. त्या प्रवास योजनेची माहिती देण्याकरिता पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी आमदार मिसाळ बोलत होत्या.

यावेळी संयोजक श्री. ॲड. धर्मेंद्रजी खांडरे, पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष योगेश टिळेकर, पुणे जिल्हा बँकेचे संचालक प्रदीप कंद, माजी जिल्हा परिषद सदस्या आशा बुचके, पिं. चिं. शहर संघटन सरचिटणीसखेड तालुका अध्यक्ष अतुल देशमुख यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. आमदार मिसाळ म्हणाल्या की, शिरुर, बारामती, शिर्डी अशा तीन मतदार संघाचे क्लस्टर केले असून, त्याची जबाबदारी रवि अनासपुरे व सुनील कर्जतकर यांच्याकडे आहे. हडपसर, आंबेगाव, मंचर, जुन्नर , शिरुर आणि भोसरी विधानसभा मतदार संघनिहाय केंद्रीय मंत्र्यांच्या दौऱ्याचे नियोजन केले आहे.

भाजपाकडून केंद्रीय पातळीवर देशातील १४४ लोकसभा मतदार संघांची यादी केली असून, त्यामध्ये महाराष्ट्रातील १६ मतदार संघांचा समावेश आहे. या सर्व मतदार संघांमध्ये भाजपा विजयश्री खेचून आणण्याच्या दृष्टीने पुढील अडीच वर्षांचे नियोजन केले आहे. मतदार संघातील सहा विधानसभा मतदार संघामध्ये प्रवास योजनेची कमिटी नियुक्ती केली आहे. प्रभारी, संयोजक, सोशल मीडिया, कल्याणकारी योजना आदी विविध स्तरांवर समितीच्या नियुक्ती केल्या आहेत.

### प्रलंबित प्रश्नांबाबत केंद्राकडे पाठपुरावा...

संघटनात्मक बांधणीमुळेच भाजपाने यशस्वी वाटचाल ठेवली आहे. आगामी दीड वर्षांत शिरुर लोकसभा मतदार संघातील प्रलंबित प्रश्न केंद्रापर्यंत पोहोचवून मार्गी लावण्यासाठी आम्ही पाठपुरावा करणार आहोत. नदी सुधार प्रकल्प, पुणे-नाशिक महामार्ग, रेड झोन, तीर्थक्षेत्र विकास, ग्रामीण भागातील राष्ट्रीय महामार्ग आदी विविध प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले जातील, असेही आमदार मिसाळ यांनी म्हटले आहे.

### ... असा असेल दौरा

केंद्रीय आदिवासी विकास मंत्री रेणुका सिंग यांच्या तीन दिवसीय दौऱ्यात संघटनात्मक आणि सार्वजनिक असे एकूण २१ कार्यक्रम होणार आहेत. पदाधिकाऱ्यांशी संवाद, लाभार्थींची चर्चा, भाजपा परिवारातील संस्था, संघटनांच्या प्रतिनिधींशी संवाद, हुतात्मे- महात्मे यांच्या स्मारकांना भेटी, वारकरी सांप्रदायातील लोकांशी संवाद, तीर्थक्षेत्र भीमाशंकर भेट, स्थानिक नागरिकांशी संवाद, आदिवासी बांधवांशी चर्चा, शासकीय अधिकाऱ्यांशी आढावा बैठक, महामार्ग समस्या पाहणी

# कौतुकास्पद : शहरात १५२ टन निर्माल्य संकलन!

## महापालिका प्रशासनाच्या उपक्रमाला प्रतिसाद : पर्यावरण संर्वधनाचा संदेश

पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**गेले दोन वर्षे कोविड आणि लॉकडाउनमुळे गणेशोत्सव सार्वजनिकरित्या उत्साहात साजरा करता आला नाही. मात्र, यावर्षी निर्बंधमुक्त उत्सव झाला. पिंपरी-चिंचवडकरांनी मोठ्या भक्तीभावाने गणरायाचे स्वागत आणि निरोपही दिमाखदार केला.**




पर्यावरण संवर्धन आणि नदी प्रदूषण रोखण्याचा संदेश देत महापालिका प्रशासनाने निर्माल्य संकलन उपक्रम हाती घेतला होता. निर्माल्य नदी पात्रात किंवा इतरत्र न टाकता निर्माल्य कुंडात जमा करावे, असे आवाहन करण्यात आले होते. त्याला पिंपरी-चिंचवडकर नागरिकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

त्यामुळे यावर्षी १५२ टन इतके विक्रमी निर्माल्य संकलित करण्यात आले. शहरातील एकुण ८ प्रभागाच्या ३८ खेपामधून १,४०,९७० किलो निर्माल्य जमा झालेले असून त्यापासून खत निर्मीती केली जाणार आहे.

या व्यतिरिक्त प्रभाग क्रमांक १६ मधील मेट्रो गार्डन रावेत आणि प्रभाग क्रमांक १८ ऑक्सिजन पार्क चिंचवड येथे व प्रभाग क्रमांक २२ जोतिबा गार्डन काळेवाडी या उद्यानात कंपोष्ट पीट मध्ये १२ टन निर्माल्य पाठविणेत आले आहे असे एकुण १,५२,९७० (१५२ टन) निर्माल्य संकलीत केले असल्याची माहिती महापालिकेचे सहाय्यक आरोग्य अधिकारी गणेश देशपांडे यांनी दिली.

### दि. 31 ऑगस्ट ते 10 सप्टेंबर 2022 या कालावधीतील निर्माल्य संकलनाची प्रभाग निहाय आकडेवारी खालीलप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| 1) अ प्रभाग | - ७ खेपामधून | २६,९३५ किलो |
| 2) ब प्रभाग | - ४ खेपामधून | १८,५८५ किलो |
| 3) क प्रभाग | - ७ खेपामधून | १३,४७५ किलो |
| ४) ड प्रभाग | - ७ खेपामधून | १९,८८५ किलो |
| ५) ई प्रभाग | - ३ खेपामधून | १४,७३० किलो |
| ६) फ प्रभाग | - ३ खेपामधून | १९,३९० किलो |
| ७) ग प्रभाग | - ४ खेपामधून | १५,६६५ किलो |
| ८) ह प्रभाग | - ३ खेपामधून | १२,३०५ किलो. |

## संपादकीय »

# अर्थविषयक सामाईक समज!

*किती आणि कसे असायला हवे याचा अंदाज नसेल तर असेल तितके आणि तसे गोड मानून घेतले जाते. ही सर्वसाधारण मानवी स्वभावाची मर्यादा आहे. पण तिचा चातुर्यपूर्ण वापर कथानक निश्चितीसाठी केला जाऊ लागल्यास त्यातून एक ठोस वातावरणनिर्मिती करता येते.*

या वास्तवाचे दृश्य स्वरूप म्हणजे अर्थविषयक सामाईक समज. उदाहरणार्थ गेल्या महिन्याच्या अखेरीस सकल राष्ट्रीय उत्पन्न १३.५ टक्के इतक्या वेगाने वाढल्याच्या वृत्ताने अनेकांस झालेला हर्षोल्हास. यंदाच्या वर्षातील हा सर्वाधिक वेग असेही या संदर्भात सांगितले गेल्याने या हर्षोल्हास प्रसाराचा वेग अधिकच वाढला. तथापि अर्थगती १३.५ टक्के नोंदली गेली असली आणि ही बाब त्यातल्या त्यात आनंददायी असली तरीही ही गती १६ टक्के इतकी असेल असे अपेक्षित होते. तशी ती असती तर ते अधिक आनंददायी ठरले असते. म्हणजे वास्तव असे की अर्थगती वाढली असली तरी प्रत्यक्षात हा वाढीचा वेग किमान तीन टक्क्यांनी अपेक्षेपेक्षा कमी आहे. याचाच दुसरा भाग असा की इतक्या 'नेत्रदीपक' गतीने वाढूनही गेल्या तीन वर्षांचा वाढीचा सरासरी वेग साडेतीन टक्के इतकाही नाही. या तपशिलाने समाजमाध्यमी वीरांच्या उत्साहावर पाणी पडणार असले तर त्यास इलाज नाही. कारण आर्थिक विचार करताना 'वाटण्या'इतके महत्त्व 'असण्या'सही असते. या पार्श्वभूमीवर सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्राच्या दुरवस्थेचे समोर आलेले चित्र अर्थव्यवस्था प्रत्यक्षात 'कशी' आहे हे दाखवून देते. करोनाकाळात सरकारकडून आर्थिक मदत द्यावी लागलेल्या सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योगांतील प्रत्येकी सहापैकी एकाचे कर्ज बुडीत खाती गेले आहे. अशी आर्थिक रसद द्यावी लागलेल्या ९८ लाख उद्योगांतील १६ लाखांहून अधिक उद्योग आज बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. हे प्रमाण १६ टक्के इतके होते.

हा तपशील 'द इंडियन एक्स्प्रेस'ने माहिती अधिकारांतर्गत मिळवला असून या क्षेत्रास असा पतपुरवठा करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या 'नॅशनल क्रेडिट गॅरंटी ट्रस्टी कंपनी लिमिटेड' या सरकारी यंत्रणेकडूनच पुरवण्यात आलेला आहे. ही कंपनी केंद्र सरकारने करोनाकाळात संकटग्रस्त सूक्ष्म/लघु/मध्यम उद्योग क्षेत्राच्या मदतीसाठी स्थापन केली. या कंपनीतर्फे दिल्या गेलेल्या कर्जाचे मोठ्या प्रमाणावर बुडीत रूपांतर होणे हे अधिक वेदनादायी आहे याचे कारण यातील बव्हंशी कर्जे ही २० लाख रुपयांच्या आतीलच आहेत. यावरून किती लहान उद्योगांस मदतीचा हात द्यावा लागला आणि तरीही ती कशी वाचू शकली नाहीत याचा अंदाज यावा.



## आनंदी सकाळ

# अत्रि, अनसूया, दत्तात्रय भारतीय अध्यात्मात चेतनेच्या स्फुल्लिंगासारखे

भारतीय धर्म, संस्कृतीनुसार कुटुंब हा सामाजिक एकात्मतेचा व मूल्यसापेक्ष जीवन-सरणीचा मुख्य घटक आहे. त्यात व्यक्ती महत्त्वाची नाही, सामुदायिक सहजीवन, सामंजस्य, आपुलकी, त्याग, तत्त्वे, शिस्त, परंपरा व योग्य रूढींनी कौटुंबिक जीवनाचे वस्त्र विणले जाते. वाल्मिकी ऋषींनी अनसूया प्रसंगांद्वारे कुटुंबासारख्या सामान्य विषयाला महाकाव्याची श्रेष्ठता, भावभूमीची गंभीरता दिली आहे. मैत्रेयी, अनसूया, लोपामुद्रा या स्त्रिया स्वतंत्र, समर्थ होत्या. सामाजिक समानता त्यांनी वैयक्तिक सामर्थ्यातून, गुणातून प्रतिष्ठित केली. भारत अशा समानतेचा आग्रही देश आहे, हेही नकळतपणे ही स्त्री-चरित्रे सांगतात. अनसूया-सीतेची भेट सीतेमध्ये सामावलेल्या सावित्री शक्तीला पूर्ण चैतन्यमय करणारी आहे. सीतेच्या व्यक्तिमत्त्वात ती तेजोमयता पूर्णत्वाला नेण्यासाठी अनसूया तिला दिव्यालंकार आभूषणे, दिव्यवस्त्रे देऊन तिच्यामध्ये दिव्यता प्रकाशित करते आहे.

# एक होती राणी एलिझाबेथ...




राजघराणे आणि राजसत्ता ही संकल्पना आता आधुनिक काळात फार महत्त्वाची राहिली नसली, तरी राजघराण्याला देव्हाऱ्यात बसवून पारंपरिक भक्तिभावाने त्याचे गुणगान करणारे काही देश जगाच्या पाठीवर अजून शिल्लक आहेत. युनायटेड किंगडम अर्थात ब्रिटन हा त्यातलाच एक. या देशाची राणी एलिझाबेथ द्वितीय यांचे गुरुवार, ८ सप्टेंबर रोजी निधन झाले. राणीपदावर तब्बल ६९वर्षे राहण्याचा विक्रम एलिझाबेथ यांच्या नावावर नोंदला गेलाय. या राणीविषयी...

राजघराणे आणि राजसत्ता ही संकल्पना आता आधुनिक काळात फार महत्त्वाची राहिली नसली, तरी राजघराण्याला देव्हाऱ्यात बसवून पारंपरिक भक्तिभावाने त्याचे गुणगान करणारे काही देश जगाच्या पाठीवर अजून शिल्लक आहेत. युनायटेड किंगडम अर्थात ब्रिटन हा त्यातलाच एक. या देशाची राणी एलिझाबेथ द्वितीय यांचे गुरुवार, ८ सप्टेंबर रोजी निधन झाले. राणीपदावर तब्बल ६९वर्षे राहण्याचा विक्रम एलिझाबेथ यांच्या नावावर नोंदला गेलाय. या राणीविषयी...

ब्रिटनच्या राणी एलिझाबेथ द्वितीय यांचे गुरुवारी निधन झाल्याने ब्रिटिश साम्राज्याचे राजपद सर्वाधिक काळ भोगलेली व्यक्ती आता काळाच्या पडद्याआड गेली आहे. एलिझाबेथ यांनी २०१५ मध्येच वयाच्या ८९व्या वर्षी ब्रिटनची सर्वात प्रदीर्घ काळ राणी म्हणून हयात असलेली व्यक्ती हा विक्रम नोंदविला होता. त्यानंतर सात वर्षे त्या हयात होत्या. राणी म्हणून पदावर असण्याचा त्यांचा काळ सुमारे ६९ वर्षांहून अधिक होता. यापूर्वी हा विक्रम एलिझाबेथ यांच्या खापरपणजी राणी व्हिक्टोरिया यांच्या नावावर होता. त्या १८३७ ते १९०१ या काळात ब्रिटनच्या राणी होत्या. हा विक्रम राणी एलिझाबेथ यांनी मोडला. वयाच्या ९६व्या वर्षी त्यांनी बालमोराल येथील पॅलेसमध्ये अखेरचा श्वास घेतला, तेव्हा काळाचा एक विस्तृत पट पाहणारी एक जिवंत दंतकथा आता इतिहासात जमा झाली आहे.



ब्रिटन ही वास्तविक जगातील सर्वात जुनी लोकशाही. या देशाने जगाला आधुनिक लोकशाही विचार दिला, शास्त्रशुद्ध आचार-विचारांची बैठक दिली, विज्ञाननिष्ठा, नवे प्रदेश शोधण्याचे साहस, कमालीचे स्वदेशप्रेम, शिस्त आदी गुण दिले याविषयी सर्वसाधारण जगात एकमत असावे. याच वेळी कमालीचे परंपरावादी आणि जुन्या गोष्टी निष्ठेने जतन करणारेही हेच लोक आहेत. त्यामुळे या देशात राजसत्तेचे महत्त्व अजूनही अबाधित आहे. राजा किंवा राणी रूढ अर्थाने राज्य करीत नसले, तरी शिक्क्याचे धनी तेच आहेत. ब्रिटनचे लष्कर अजूनही रॉयल आर्मी आहे आणि त्यांचे नौदलही रॉयल नेव्ही. ब्रिटिशांना आपल्या राजघराण्याविषयी कमालीचे प्रेम आहे. शिवाय ही राणी तशी केवळ फक्त ब्रिटनची नाही, तर कॅनडा, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया आदी राष्ट्रकुलातील अनेक देश या राणीला आपलीच राणी मानतात. (भारत राष्ट्रकुलात असला, तरी आपण त्या राणीला आपली राणी मानत नाही.)

# अर्थव्यवस्थेच्या वाढीत कृषीचा सहभाग

**पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी मोठ्या प्रमाणात संपत्ती निर्माण करण्यास वाव असलेल्या कृषी क्षेत्राकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नाही.**

किंबहुना हे क्षेत्र त्या मोहिमेत महत्त्वाचा वाटा उचलू शकते. मात्र, त्यासाठी नव्या संकल्पना, पुरेश्या पायाभूत सुविधा आणि वित्तपुरवठा या घटकांकडे विशेषत्वाने लक्ष पुरविणे आवश्यक आहे.

पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी मोठ्या प्रमाणात संपत्ती निर्माण करण्यास वाव असलेल्या कृषी क्षेत्राकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नाही. किंबहुना हे क्षेत्र त्या मोहिमेत महत्त्वाचा वाटा उचलू शकते. मात्र, त्यासाठी नव्या संकल्पना, पुरेश्या पायाभूत सुविधा आणि वित्तपुरवठा या घटकांकडे विशेषत्वाने लक्ष पुरविणे आवश्यक आहे.

केंद्र सरकारने २०२४ पर्यंत आदेशाला ५ ट्रिलियन डॉलर (५०० हजार कोटी) अर्थव्यवस्थेकडे नेण्याचा मानस स्पष्ट केला आहे. थोडक्यात, आजच्या अर्थव्यवस्थेला जवळपास दुप्पट करण्याचे ध्येय ठरविले आहे. पण ते साध्य करण्याचे



धोरण काय आहे, याची पुरेशी स्पष्टता नाही. अर्थात एवढी उंच झेप घेण्यामध्ये तंत्रज्ञानाद्वारे माहितीचे संकलन आणि आधुनिकीकरणाची मोठी भूमिका स्वाभाविकच असेल. भारतीय लोकसंख्येपैकी सुमारे ५८ टक्के नागरिकांकडे उपजीविकेचे प्राथमिक साधन शेती हे आहे. आज असलेले ग्रामीण उपजीविका क्षेत्र जर 'आधुनिक व्यवसायातील एक' अशा भूमिकेत विचारात घेतले, तर कृषी क्षेत्रही या मोहिमेमध्ये भाग घेऊ शकेल. शेतीमध्ये कष्टाच्या मानाने परतावा कमी असतो. तरीही अश्या प्रतिकूल परिस्थितीतसुद्धा शेतकऱ्यांचा कणखरपणा आणि लवचिकतेमुळे कृषी क्षेत्र हे एकमेव आहे, की ज्याने गेल्या वर्षी (२०२०-२१) सकारात्मक वाढ (३.४ टक्के) दर्शविली, जेव्हा इतर क्षेत्रे कोव्हिडच्या काळात पुरेसे चांगले काम करू शकली नाहीत. आर्थिक सर्वेक्षणा नुसार (२०२०-२१) सकल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) कृषी क्षेत्राचा वाटा जवळपास २० टक्क्यांवर पोहोचला आहे. भारताच्या सकल मूल्यवर्धित (जीव्हीए) मध्ये शेतीचा वाटा सुमारे १७-१८ टक्के आहे.

उत्पादन कसे वाढेल?

भारतात जवळ जवळ ४० टक्के शेतकरी एका एकरापेक्षा कमी जमिनीवर गुजराण करतात तर एक ते तीन एकर जमीन असलेले शेतकरी ३० टक्के आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी सहकारी शेती, पुरेशी सिंचन सुविधा, आवश्यक आणि पुरेसा प्रारंभिक वित्तपुरवठा (बँकांचे योगदान महत्त्वाचे), शेतीच्या बनावट औषधांचे उत्पादन वापरणे टाळणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ज्ञानावर आधारित कृषीपद्धती अमलात आणणे आवश्यक आहे.

## ॥ अभंगवाणी ॥



माझी पाठ करा कवी ।  
उट लावी दारोदार ॥१॥  
तंव तया पारखी सिव ।  
लाजे ठाव सांडितां ॥ध्रु.॥  
**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### “धर्माच्या नावावर थयथयाट बंद करा”

।मुंबई। महाईन्यूज।

शिवसेनेच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी गणपती विसर्जनाच्या पद्धतीवरुन अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांचा खरपूस शब्दात समाचार घेतला आहे. “तुम्ही स्वत:ला हिंदुत्ववादी म्हणून घेता पण तुम्हाला गणपती विसर्जनाची साधी पद्धत माहिती नाही?”,असा सवाल करत अंधारे यांनी नवनीत राणांवर टीकास्त्र डागले आहे. धर्माच्या नावावर थयथयाट बंद करा, असा सल्लाही अंधारे यांनी नवनीत राणांना दिला आहे. नवनीत राणा धर्माच्या नावावर वारंवार अवडंबर माजवत आहेत. त्यांना आरसा दाखवण्याची गरज असल्याचे अंधारे म्हणाल्या आहेत. इतर धर्मियांकडून गणपती विसर्जनाची पद्धत चुकली असती तर नवनीत राणांनी कहर केला असता, असेही अंधारे यांनी म्हटले आहे. “आम्ही तुमच्यासारखे आक्रस्ताळेपणाने बोलत नाही याचा अर्थ आम्हाला धर्म कळत नाही असा होत नाही.

# शिवसेना-शिंदे गटात जोरदार राडा!

## मिरवणुकीतील वादाचं रुपांतर हाणामारीत, सदा सरवणकरांनी गोळीबार केल्याचा आरोप!





।मुंबई। महाईन्यूज।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी केल्यापासून मागच्या दोन महिन्यात शिंदे गट विरूद्ध शिवसेना असा वाद सुरू आहे. मागच्या काही दिवसांपासून राज्यात बंडखोर आमदार आणि शिवसैनिकांमध्ये वाद होताना दिसत आहेत. दरम्यान शिंदे गट आणि शिवसेनेचा वाद आता हातघाईवर जाऊन पोहोचला आहे. गणपती विसर्जनावरून शिंदे गटातील बंडखोर आमदार सदा सरवणकर आणि शिवसैनिक भिडल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान यामध्ये सरवणकर यांनी गोळीबार केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. याबाबत आमदार सदा सरवणकर यांनी मात्र आरोपांचे खंडण केले आहे. मुंबईत मागच्या कित्येक तासांपासून गणपती विसर्जनाच्या मिरवणुका निघत आहेत. दरम्यान यावेळी किरकोळ वादावादीचे प्रसंगी घडले परंतु शिंदे गट आणि शिवसेना आमनेसामने आल्याने या वादाचे रुपांतर मोठ्या स्वरुपात होण्याची शक्यता होती. प्रभादेवीमध्ये शुक्रवारी शिंदे विरुद्ध शिवसेना गटात जोरदार राडा झाला. बंडखोर आमदार सदा सरवणकर विसर्जन मिरवणुकीवेळी मनसेच्या स्वागत कमानीमध्ये दिसून आले होते. यावरून वातावरण तंग होते परंतु कोणताही वाद झाला नव्हता. दरम्यान, हा वाद शनिवारी आणखी टोकाला गेला. शिंदे गटातील शाखाप्रमुख संतोष तेलवणे यांना शिवसेना कार्यकर्त्यांनी चोप दिला. यामुळे परिसरात तणाव निर्माण झाला होता. अखेर जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी सौम्य लाठीचार्जही केल्याची माहिती समोर आली आहे. यानंतर आमदार सदा सरवणकर यांनी गोळीबार केल्याचा आरोप शिवसैनिकांनी केला आहे. यावरून शिंदे गट विरूद्ध शिवसेना असा वाद पुन्हा पेटण्याची शक्यता आहे.

शिंदे गटाचे आमदार सदा सरवणकर यांच्यावर शिवसेनेचे आमदार सुनील शिंदे गंभीर आरोप करत म्हणाले कि, सदा सरवणकर यांनी गोळीबार केला आहे.

### गणपती विसर्जन मिरवणुकीत नेमकं काय झालं?

गणेश विसर्जनच्या दिवशी प्रभादेवी परिसरात शिवसेनेकडून गणेश भक्तांचे स्वागत करण्यासाठी मंच उभारण्यात आला होता. मात्र, या मंचाच्या शेजारी शिंदे गटानेदेखील आपला मंच उभारला होता. या मंचावरून शिंदे गटाचे आमदार सदा सरवणकर यांनी म्याव म्याव म्हणत शिवसेनेच्या नेत्यांना डिवचले. त्यामुळे दोन्ही गटात शाब्दिक बाचाबाचीदेखील झाली होती. हे दोन्ही गट आमने-सामने भिडल्यामुळे परिसरात काहीसं तणावपूर्ण वातावरण निर्माण झालं होतं. अखेर पोलिसांनी मध्यस्थी केल्यानंतर हा वाद काहीसा कमी झाला.

### शिवसेना आमदार सुनील शिंदेंचा आरोप

सत्तेचा माज या लोकांना आला आहे. सत्तेमुळे ही मंडळी किती उन्मत्त झाली आहेत हे सगळं या दोन दिवसांत दिसतंय. शिवसैनिक म्हणून हे सगळं आम्ही किती सहन करायचं? आमच्या विभाग प्रमुखांना गोळीबारातून टार्गेट करण्याचा प्रयत्न होता, असा आरोप शिवसेनेचे आमदार सुनील शिंदे यांनी केला आहे.

# ‘ना कचरा करुंगी, ना करने दुंगी’

## गणेश विसर्जनानंतर समुद्र किनाऱ्यांच्या स्वच्छतेसाठी अमृता फडणवीस सरसावल्या

।मुंबई। महाईन्यूज।

दोन वर्षांनंतर यंदा गणपती विसर्जन मोठ्या उत्साहात पार पडले. शनिवारी सकाळपर्यंत मुंबईतील चौपाट्यांवर गणरायाला निरोप देण्यासाठी गणेशभक्त मोठ्या संख्येने दाखल होत होते. विसर्जनानंतर या भागात घाणीचे साम्राज्य हे दरवर्षीचे चित्र असते. पण यंदा राजकीय नेत्यांबरोबर सामाजिक संस्थांनी सामाजिक बांधिलकी जोपासत समुद्र किनाऱ्यांवर स्वच्छता मोहिमेला सुरवात केली होती. अमृता फडणवीस आणि भामला फाउंडेशनचे संस्थापक आसिफ भामला यांनी जुहू बीचवर स्वच्छता मोहिम राबवली. ‘ना कचरा करुंगी, ना करने दुंगी’ म्हणत अमृता फडणवीस यांनी स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. १० दिवसांचा गणेशोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. गणपती विसर्जनानंतर मुंबईच्या समुद्रकिनाऱ्यांवरील दृश्य उदासीनतेचे असते. कारण विसर्जनानंतर मुर्तीचे अवशेष, निर्माल्य सारं काही किनाऱ्यांवर जमा होतं.



अमृता फडणवीस आणि भामला फाउंडेशनचे संस्थापक आसिफ भामला यांनी जुहू बीचवर स्वच्छता मोहिम राबवली. ‘ना कचरा करुंगी, ना करने दुंगी’ म्हणत अमृता फडणवीस यांनी स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. १० दिवसांचा गणेशोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. गणपती विसर्जनानंतर मुंबईच्या समुद्रकिनाऱ्यांवरील दृश्य उदासीनतेचे असते. कारण विसर्जनानंतर मुर्तीचे अवशेष, निर्माल्य सारं काही किनाऱ्यांवर जमा होतं. शहर नागरी प्राधिकरणाच्या प्रयत्नांना पाठिंबा देताना, गणपती विसर्जनानंतर शहरातील समुद्रकिनाऱ्यांच्या चिंताजनक समस्येबद्दल जनजागृती करण्यासाठी अमृता फडणवीस यांनी स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला

शहर नागरी प्राधिकरणाच्या प्रयत्नांना पाठिंबा देताना, गणपती विसर्जनानंतर शहरातील समुद्रकिनाऱ्यांच्या चिंताजनक समस्येबद्दल जनजागृती करण्यासाठी अमृता फडणवीस यांनी स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला मंगल प्रभात लोढा यांच्या हस्ते या मोहिमेला हिरवा झेंडा दाखवून सुरवात झाली. यावेळी अमृता फडणवीस यांच्यासोबत आमदार आणि अभिनेत्यांनीही सहभाग घेतला होता. विशेष म्हणजे २ हजारहून अधिक स्वयंसेवक या मोहिमेत सहभागी झाले होते.

स्वत:ला आणि पर्यावरणाला स्वच्छ ठेवणे ही मूलभूत गरज आहे. याची शिकवण आपल्याला लहानपणापासून देण्यात आली आहे. स्वच्छतेचे धडे गिरवून त्यांना आपल्या रोजच्या दैनंदिन जीवनात लागू करणे हा एकमेव उपाय आहे. जेणेकरून आपण निसर्गाच्या संसाधनांचा पूर्ण आनंद घेऊ शकतो. आपल्या मुलांना शुद्ध पर्यावरण देऊ शकतो आणि सागरी जीवन निर्मल बनवू शकतो. प्लॅस्टिकचे दीर्घकाळ विघटन होत नसल्यामुळे आपल्या अन्न आणि पाण्यात प्लास्टिकचे सूक्ष्म कण आधीच दिसून येतात. जर हे थांबले नाही तर ते निसर्गासोबत आपले आरोग्यही धोक्यात येईल असे फडणवीस म्हणाल्या.

# विरोधकांना स्वप्नातही एकनाथ शिंदे दिसतात! - श्रीकांत शिंदे

।मुंबई। महाईन्यूज।



एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नवीन सरकार स्थापन झाल्यापासून सत्ताधारी आणि विरोधकांमधील संघर्ष दिवसेंदिवस तीव्र होताना पाहायला मिळत आहे. शिवसेना विरुद्ध शिंदे गट, शिवसेना विरुद्ध भाजपा, काँग्रेस विरुद्ध भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध भाजपा असे अनेक पदर या संघर्षाचे दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर सातत्याने टीका करणाऱ्या विरोधकांना त्यांचे पुत्र आणि खासदार श्रीकांत शिंदे यांनी टोलेबाजी केली आहे. केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर सध्या ठाणे-कल्याणच्या दौऱ्यावर असून त्या पार्श्वभूमीवर प्रसारमाध्यमांशी बोलताना श्रीकांत शिंदेंनी विरोधकांच्या टीकेला खोचक शब्दात प्रत्युत्तर दिलं आहे. शनिवारी एका कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते देशाचे सरन्यायाधीश यू. यू. लळीत यांचा सत्कार करण्यात आला. यावर विरोधकांकडून तीव्र आक्षेप घेतला जात आहे. राज्यातील सत्तासंघर्षाचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असताना सरन्यायाधीशांनी या प्रकरणातील एका पक्षासोबत कार्यक्रमात हजेरी लावणं चुकीचं असल्याची टीका केली जात आहे. दरम्यान, अनुराग ठाकूर यांचं मोदक देऊन स्वागत केल्याचं सांगत श्रीकांत शिंदेंनी करोना काळातील तत्कालीन ठाकरे सरकारच्या कारभारावर तोंडसुख घेतलं. “गेल्या अडीच वर्षांत महाराष्ट्र पिछाडीवर पडला होता.

# चीनची चमचेगिरी करणाऱ्यांना मिरच्या का झोंबल्या ?

## राहुल गांधींच्या टी शर्टवरुन नाना पटोलेंचा खोचक सवाल

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

काँग्रेसच्या 'भारत जोडो' यात्रेदरम्यान खासदार राहुल गांधी यांनी घातलेल्या टी शर्टच्या किमतीवरुन भाजपाकडून जोरदार टीका करण्यात आली होती. या टीकेवर पलटवार करत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपाचा चांगलाच समाचार घेतला आहे. "चीनची चमचेगिरी करणारे जे लोक देशात सत्तेत बसले आहेत, त्यांना राहुल गांधींच्या टी शर्टवरुन मिरची का झोंबली?" असा खोचक सवाल पटोले यांनी केला आहे. चीनने भारताच्या अरुणाचल प्रदेश, लेह-लदाखच्या काही भागावर ताबा मिळवल्याचा आरोप राहुल गांधी सातत्याने करत आहेत. त्यावर केंद्र सरकार एक शब्ददेखील बोलायला तयार नाहीत, असे राजापुरात



माध्यमांशी बोलताना पटोले म्हणाले आहेत. यावेळी त्यांनी गृहमंत्री अमित शाह यांच्यावर तिखट शब्दात टीका केली आहे. "अमित शाहांनी फालतू उपद्व्याप बंद करावेत. त्याऐवजी त्यांनी देशाची सीमा सुरक्षा, महागाई, बेरोजगारी, शेतकरी आत्महत्या या समस्यांवर बोलावे", असा सल्ला पटोले यांनी शाह यांना दिला आहे. दरम्यान, भाजपा राहुल गांधी यांच्या पदयात्रेला घाबरली असल्याचा आरोप पटोले यांनी केला आहे.

राहुल गांधी यांनी 'भारत जोडो' यात्रेदरम्यान घातलेल्या टी शर्टबाबत भाजपाने ट्वीट केले होते. राहुल गांधी यांनी ब्रिटिश कंपनीच्या ब्रँडचा बर्बेरी हा पांढरा टी-शर्ट घातला होता. त्याची किंमत ४१ हजार २५७ रुपये असल्याचे भाजपाने ट्वीटमध्ये म्हटले होते. 'भारत देखो' असे कॅप्शनही त्यावर लिहले होते. या ट्वीटनंतर राहुल गांधी परिधान करत असलेल्या कपड्यांच्या किमतीबाबत बरीच चर्चा रंगली आहे.

**"अमित शाहांनी फालतू उपद्व्याप बंद करावेत. त्याऐवजी त्यांनी देशाची सीमा सुरक्षा, महागाई, बेरोजगारी, शेतकरी आत्महत्या या समस्यांवर बोलावे", असा सल्ला पटोले यांनी शाह यांना दिला आहे. दरम्यान, भाजपा राहुल गांधी यांच्या पदयात्रेला घाबरली असल्याचा आरोप पटोले यांनी केला आहे.**

### "राहुल बाबा परदेशी टी-शर्ट घालून..."; 'अमित शाहंचा राहुल गांधींवर निशाण

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेवरुन निशाणा साधला आहे. राहुल गांधींना इतिहासाचा आभ्यास करण्याची गरज असल्याची टीका अमित शाह यांनी केली आहे. एवढचं नाही तर राहुल बाबा परदेशी टी-शर्ट आणि जर्सी घालून भारत जोडो यात्रेत सहभागी झाले असल्याचा टोलाही त्यांनी लगावला आहे. राजस्थान आणि छत्तीसगड या दोन्ही राज्यांच्या निवडणुका २०२३ मध्ये होणार आहेत. याच पार्श्वभूमीवर राजस्थानमध्ये आयोजित सभेत शाह यांनी राहुल गांधींसह मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्यावरही निशाणा साधला आहे राहुल गांधींवर निशाणा साधताना अमित शहा म्हणाले की, आत्ताच राहुलबाबा भारत जोडो यात्रेला निघाले आहेत. राहुल बाबा परदेशी टी-शर्ट घालून भारत जोडण्यासाठी निघाले आहेत. मी राहुलबाबा आणि काँग्रेसजनांना त्यांच्या संसदेतील भाषणाची आठवण करून देतो. राहुल बाबा म्हणाले होते की भारत हे राष्ट्र नाही. अहो राहुलबाबा, कुठल्या पुस्तकात वाचलात? हे ते राष्ट्र आहे ज्यासाठी लाखो लोकांनी बलिदान दिले आहे. कन्हैयालालच्या हत्येवरुनही अमित शाहंनी गेहलोत सरकारवर टीका केली आहेकन्हैयालालची निर्घृण हत्या झाली, तुम्ही सहन कराल का, असा सवाल त्यांनी जनतेला विचारला.

### शॉर्ट न्यूज »

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनातून शरद पवारांचा भाजपावर निशाणा**



।नवी दिल्ली।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन दिल्लीत सुरू आहे. या अधिवेशनातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष काय नवीन भूमिका घेणार, हे आगामी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. तत्पुर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून शरद पवार यांची फेरनियुक्ती कालच्या एका बैठकीत करण्यात आली, त्याची अधिकृत घोषणा देखील या अधिवेशनामध्ये होणार आहे. आज शरद पवारांनी आपल्या भाषणातून विविध मुद्द्यांवरून केंद्रातील मोदी सरकारवर निशाणा साधल्याचे दिसून आले. ज्यामध्ये प्रामुख्याने, देशाची आर्थिकस्थिती, शेतकरी आत्महत्या, महिलांवरील अत्याचार आणि सामाजिक, धार्मिक वाद यांचा समावेश होता.

# पाकिस्तानातील हिंदू समाजाकडून माणुसकीचे दर्शन!

## पूरग्रस्तांसाठी उघडले मंदिराचे दरवाजे

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

पाकिस्तानात पुराने अक्षरश: थैमान घातले आहे. यामुळे नागरिकांना मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. या कठिण काळात बलुचिस्तानातील हिंदू समाजाने पूरग्रस्तांना मदतीचा हात दिला आहे. पूरग्रस्तांना निवारा देण्यासाठी कच्छी जिल्ह्यातील जलाल खान या गावातील बाबा मधूदास मंदिराचे दरवाजे उघडण्यात आले आहेत. पाकिस्तानच्या 'डॉन' या वृत्तपत्राने याबाबतचे वृत्त दिले आहे. पाकिस्तानातील पुराचा ८० जिल्ह्यांना तडाखा बसला आहे. या नैसर्गिक आपत्तीत आत्तापर्यंत १२०० जणांनी



आपला जीव गमावला आहे. 'यूनायटेड नेशन्स पोप्युलेशन फंड'(UNFPA) या संस्थेने पूरग्रस्त भागातील ६ लाख ५० हजार गर्भवती महिलांना आरोग्य सुविधा पोहोचवण्याबाबत चिंता व्यक्त केली आहे. या महिलांना सुरक्षित बाळंतपणासाठी तात्काळ मदतीची गरज असल्याचे या संस्थेने म्हटले आहे. विक्रमी पाऊस आणि पुरामुळे पाकिस्तानातील ३३ दशलक्ष लोकांना फटका बसला आहे. यामुळे पूरग्रस्त भागात विविध आजार बळावले आहेत. पाकिस्तानातील बहुतांश भाग पाण्याखाली गेला असून नागरिकांवर स्थलांतर करण्याची वेळ आली आहे. या पुरामुळे पाकिस्तानातील शेतीचेही अतोनात नुकसान झाले आहे. २०२२-२३ या चालू आर्थिक वर्षामध्ये पाकिस्तानातील कृषी क्षेत्राचा विकासदर शून्य टक्के राहण्याची शक्यता आहे. या पुरामुळे पाकिस्तानात ३० अब्ज डॉलर्सचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

# ३०६ खासदार असूनही मोदी तक्रार करतात की..."



### असदुद्दीन ओवेसींचा खोचक टोला; नितीश कुमारांनाही केलं लक्ष्य!

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

एकीकडे राज्यात शिवसेनेतील बंडखोरी, शिंदेंच सरकार आणि शिंदेगट-शिवसेना यांच्यातील वितुष्ट या घडामोडी घडत असताना दुसरीकडे राष्ट्रीय पातळीवर तिसऱ्या आघाडीची जोरदार चर्चा पुन्हा एकदा सुरू झाली आहे. या आघाडीचा चेहरा म्हणून कधी ममता बॅनर्जींचं नाव घेतलं जातं, कधी शरद पवार तर कधी नितीश कुमार. बिहारमध्ये दोनच दिवसांत सत्ताबदल करून राजदच्या पाठिंब्यावर पुन्हा मुख्यमंत्री झालेल्या नितीश कुमार यांची चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर एमआयएमचे अध्यक्ष आणि खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी अहमदाबाद दौऱ्यावर असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांना लक्ष्य केलं आहे.

# काजोलचे ओटीटी माध्यमात दमदार पदार्पण

बॉलिवूड अभिनेत्री काजोलनं एकेकाळी आपल्या दमदार अभिनयाच्या जोरावर चित्रपटसृष्टी गाजवली आहे. आजही काजोलचा अभिनय तेवढाच दमदार आहे. चित्रपटांनंतर आता काजोल लवकरच वेब सीरिजच्या माध्यमातून ओटीटी प्लॅटफॉर्मवर पदार्पण करणार आहे. नुकताच तिचा वेब सिरीजचा टीझर प्रदर्शीत झाला असून काजोलचा फर्स्ट लूक समोर आला आहे. डिस्नी प्लस हॉटस्टार'च्या 'द गुड वाईफ : प्यार, कानून, धोका' या सिरीजमधून ती ओटीटी प्लॅटफॉर्मवर पदार्पण करत आहे. काजोलने जुलैमध्ये एका व्हिडिओच्या माध्यमातून या नव्या वेब सिरीजची घोषणा केली होती. तर नुकताच तिने या वेब सिरीजमधील तिचा फर्स्ट लूक दाखवणारा एक व्हिडीओ सोशल मीडियावर पोस्ट केला. मुख्य म्हणजे या वेब सिरीजमध्ये ती आपल्याला एका वकिलाच्या भूमिकेत दिसणार आहे. या व्हिडीओत ती एका वकिलाचा लूकमध्ये ऑफिसला जाताना दिसत आहे. हा व्हिडीओ पोस्ट करताना तिने कॅप्शनमध्ये लिहिले, "सुरुवात करूया?" तर काजोलची बहीण तनिषा मुखर्जी हिनेही या आगामी वेब सिरीजचा टीझर पोस्ट करून काजोलचा फर्स्ट लूक शेअर केला आहे.



ही वेब सिरीज लोकप्रिय अमेरिकन कार्यक्रम 'द गुड वाईफ'चा रिमेक आहे. हा मूळ कार्यक्रम सीबीएस स्टुडिओने तयार केला होता, जो २००९-२०१६ मध्ये प्रसारित केला गेला होता. अभिनेत्री जुलियाना मार्गुलीजने त्यात मुख्य भूमिका साकारली होती. तर काजोलच्या 'द गुड वाईफ : प्यार, कानून, धोका' या सिरीजचे दिग्दर्शन सुपर्ण वर्मा करत करत आहेत आणि बनजय एशिया यांची निर्मिती आहे.काजोल या सिरीजच्या माध्यमातून ओटीटीत पदार्पण करण्यासाठी उत्सुक आहे. ती म्हणाली, "माझ्या संपूर्ण अभिनय प्रवासात मी अनेक व्यक्तिरेखा साकारल्या आहेत, पण पहिली भूमिका नेहमीच खास असते. ओटीटी प्लॅटफॉर्म्समुळे निर्माते आणि कलाकार यांना नवनवीन प्रयोग करण्याची संधी मिळते आणि हिच या माध्यमाची खासियत आहे. माझ्या पहिल्या चित्रपटात मी वकिलाची भूमिका साकारली होती आणि योगायोग म्हणजे पहिल्या वेब सिरीजमध्येही माझी वकिलाचीच भूमिका आहे. त्यामुळे मी फार खुश आहे." सध्या या सिरीजचे चित्रीकरण सुरु आहे. या वर्षाच्या अखेरीस ही सिरीज प्रेक्षकांच्या भेटीला येईल, असे बोलले जात आहे.

# सोशल मीडियावर गायक जुबिन नौटियालला अटक करण्याची मागणी

सुप्रसिद्ध गायक जुबिन नौटियाल ने आपल्या आवाजाने अनेकांना वेड लावले आहे. त्याने आत्तापर्यंत 'राता लंबियाना', 'दिल गलती कर बैठा है', 'लुट गए', 'तुम ही आना' यांसारखी अनेक लोकप्रिय गाणी गायली आहेत. जुबिन नौटियाल त्याच्या गाण्यांमुळे वारंवार चर्चेत असतो. दरम्यान, यावेळी तो एका वेगळ्या कारणामुळे चर्चेत आला आहे. याचं कारण म्हणजे त्याची यूएसमध्ये होणारी कॉन्सर्ट आहे. या कॉन्सर्टमुळे तो सध्या निशाण्यावर आला आहे आणि त्याला प्रचंड प्रमाणात ट्रोल केलं जात आहे. इतकचं नव्हे तर त्याला अटक केल्याची मागणी देखील केली जात आहे.



# 'आपडी थापडी'चा टीझर पाहिलात का? श्रेयस-मुक्ताचा अफलातून फॅमिली ड्रामा



श्रेयस तळपदे आणि मुक्ता बर्वे यांच्या आपडी थापडी या बहुचर्चित चित्रपटाचा टीजर लाँच करण्यात आला आहे. एक मनोरंजक गोष्ट या चित्रपटातून मांडण्यात आली असून ५ ऑक्टोबरला दसऱ्याच्या मुहूर्तावर हा चित्रपट सहकुटुंब चित्रपटगृहात पाहता येईल. के सायलेंटच्या केसी पांडे यांची निर्मिती आणि प्रस्तुती असलेल्या 'आपडी थापडी' या चित्रपटाचं दिग्दर्शन आनंद करीर यांचं आहे. सुनीता करीर आणि आनंद करीर यांनी चित्रपटाचं लेखन केलं आहे. श्रेयस तळपदे आणि मुक्ता बर्वे यांच्यासह नंदू माधव, संदीप पाठक, नवीन प्रभाकर, खुशी हजारे अशी दमदार स्टारकास्ट या चित्रपटात आहे. तर सुमन साहू यांनी चित्रपटाचं छायांकन आहे. 'फॅमिलीचा चित्रपट बघा फॅमिली बरोबर' अशी टॅगलाईन असलेल्या या चित्रपटात पाटील कुटुंबाची एक मजेशीर गोष्ट उलगडली आहे. अतिशय कंजुष स्वभाव असलेला सखाराम पाटील अर्थात श्रेयस तळपदे, त्याची पत्नी अर्थात मुक्ता बर्वे आणि त्यांची मुलगी असं पाटील कुटुंब या चित्रपटाच्या केंद्रस्थानी आहे. सखाराम पाटीलच्या कंजुषीची उदाहरणं चित्रपटाच्या टीजरमध्ये आपल्याला पाहता येतात. पण या बरोबरच या कथेला एक भावनिक किनार असल्यांचीही टीजरमधून दिसतं.


# अली खानच्या 'विक्रम वेधा'चा ट्रेलर!



लेखक-दिग्दर्शक पुष्कर आणि गायत्री यांचा बहुप्रतिक्षीत चित्रपट 'विक्रम वेधा'चा ट्रेलर आज कलाकारांच्या हस्ते मुंबईतील विशेष कार्यक्रमात औपचारिकरीत्या लाँच करण्यात आला. औपचारिक प्रक्षेपणाची तयारी करत 'विक्रम वेधा'च्या निर्मात्यांनी काल कलाकारांच्या चाहत्यांसाठी दुबईसह देशभरातील 10 शहरांमध्ये एका विशेष प्रिव्हूचे आयोजन केले होते. अशा प्रकारे चित्रपट प्रमोट करण्यासाठी पुढाकार घेत भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात पहिल्यांदाच असा उपक्रम राबवण्यात आला आहे. यामुळे एक दिवस अगोदरच या चित्रपटाचा जोरदार प्रचार होण्यास मदत झाली असून, टीझरच्या प्रचंड यशानंतर अपेक्षाही वाढल्या आहेत.

# 'भाभी जी...' फेम ऑनलाइन फसवणुकीची बळी

टीव्ही शो 'भाभी जी घरपर है' गेल्या सात वर्षांपासून सातत्याने प्रेक्षकांचं मनोरंजन करत आहे. इतक्या वर्षांनी त्याची लोकप्रियता आजही कायम आहे. या शोमधील पात्र तिवारी जी, विभूती नारायण सिंह, अंगूरी भाभी आणि इन्स्पेक्टर हप्पू सिंग हे घरोघरी ओळखीचे झाले आहेत. ही पात्र साकारणाऱ्या कलाकारांनाही प्रेक्षकांचं भरभरून प्रेम मिळतंय. दरम्यान, अलीकडेच या शोमध्ये अंगूरी भाभीची भूमिका साकारणारी अभिनेत्री शुभांगी अत्रे ही ऑनलाइन फसवणुकीची बळी ठरली. त्यानंतर तिने सायबर सेलमध्ये तक्रार दाखल केली आहे. नुकतंच एका मुलाखतीत शुभांगी अत्रेने ती ऑनलाइन फसवणुकीची बळी कशी ठरली, याबद्दल सांगितलं. ती म्हणाली, "८ सप्टेंबर रोजी मी एका प्रसिद्ध फॅशन ॲप्लिकेशनमधून माझ्यासाठी काही गोष्टी ऑर्डर करत होते. मी ऑर्डर दिली त्यानंतर मला त्यांचा फोन आला. फोनवर बोलणाऱ्याने माझा पत्ता सांगितला आणि मी तीन वर्षांपासून तिथून खरेदी कशी करत आहे, याबद्दल सांगितलं. नंतर त्याने माझ्या मागच्या सर्व ऑर्डरच्या डिटेल्स दिल्या. त्यामुळे हा खरा कॉल असल्यासारखं मला वाटलं. कारण माझ्या सर्व ऑर्डर डिटेल्स फक्त त्याच कंपनीकडे असतील असं मला वाटलं."



## शॉर्ट न्यूज »

### बार्सिलोनाच्या विजयात पुन्हा



**बार्सिलोना। महाईन्यूज**

बदली खेळाडू मैदानात आल्यानंतर आघाडीपटू रॉबर्ट लेवांडोवस्कीने (एक गोल आणि दोन गोल साहाय्य) केलेल्या चमकदार कामगिरीच्या जोरावर बार्सिलोनाने स्पेनमधील ला लिगा फुटबॉलच्या सामन्यात कॅडीसवर ४-० असा विजय मिळवला. या सामन्याच्या पूर्वार्धात दोन्ही संघांना गोल करण्यात अपयश आले. उत्तरार्धात मात्र बार्सिलोनाने आपल्या आक्रमणाची गती वाढवली. ५५व्या मिनिटाला मध्यरक्षक फ्रँकी डीयॉन्गने गोल करत बार्सिलोनाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. यानंतर बार्सिलोनाने लेवांडोवस्कीला मैदानावर उतरवले. लेवांडोवस्कीने ६५व्या मिनिटाला गोल करत बार्सिलोनाची आघाडी दुप्पट केली. हा त्याचा बार्सिलोनासाठी पाच सामन्यांत नववा गोल ठरला. मग लेवांडोवस्कीच्या साहाय्याने ८६व्या मिनिटाला अंसू फाटी, तर ९० मिनिटांनंतरच्या भरपाई वेळेत ओस्मान डेम्बेले यांनी केलेल्या गोलमुळे बार्सिलोनाने हा सामना ४-० अशा फरकाने जिंकला.

# अमेरिकन खुली टेनिस स्पर्धा : श्वीऑनटेकचे वर्चस्व!

### अंतिम सामन्यात जाबेऊरवर मात करत प्रथमच अमेरिकन, तर तिसऱ्या ग्रँडस्लॅम जेतेपदावर मोहोर

**।न्यूयॉर्क । महाईन्यूज ।**



पोलंडच्या इगा श्वीऑनटेकने अग्रमानांकनाच्या दडपणाला न झुगारता प्रथमच अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेतील महिला एकेरी गटाचे जेतेपद पटकावले. हे तिच्या कारकीर्दीतील तिसरे ग्रँडस्लॅम जेतेपद ठरले. सेरेना विल्यम्सची अखेरची स्पर्धा म्हणून अधिक चर्चेत राहिलेल्या यंदाच्या अमेरिकन स्पर्धेत श्वीऑनटेकने महिला टेनिसमधील वर्चस्व पुन्हा सिद्ध केले. तिने यंदाच्या ऑस्ट्रेलियन स्पर्धेत उपांत्य फेरीची मजल मारली होती, तर फ्रेंच खुल्या स्पर्धेचे जेतेपद मिळवले होते. आता तिच्या रूपात अमेरिकन स्पर्धेलाही नवविजेती मिळाली.

दोन वेळा फ्रेंच खुल्या स्पर्धेचे विजेतेपद मिळविणाऱ्या श्वीऑनटेकने अंतिम सामन्यात पाचव्या मानांकित ट्युनिशियाच्या ओन्स जाबेऊरचा ६-२, ७-६ (७-५) असा सरळ सेटमध्ये पराभव केला. श्वीऑनटेकला यापूर्वी अमेरिकन स्पर्धेत चौथ्या फेरीच्या पुढे मजल मारता आली नव्हती. या वेळीही अग्रमानांकन मिळूनही विजेतेपदाच्या शर्यतीत तिला फारशी पसंती नव्हती. जागतिक क्रमवारीत पाचव्या स्थानावर असणाऱ्या जाबेऊरचा पराभव केल्यानंतर श्वीऑनटेकने इथपर्यंतचा प्रवास सोपा नव्हता असे सांगितले. विशेषत: या स्पर्धेपूर्वी ज्या आव्हानात्मक परिस्थितीचा सामना करावा लागला, ते पाहता यापेक्षा मोठे यश असूच शकत नाही, असेही तिने नमूद केले. अंतिम सामन्यात श्वीऑनटेकने अप्रतिम खेळ केला. तिने पहिला सेट चार गेमच्या फरकाने जिंकला. दुसऱ्या सेटमध्ये मात्र तिला संघर्ष करावा लागला. श्वीऑनटेककडे ६-५ अशी आघाडी होती आणि तिला 'मॅच पॉइंट'ची संधी होती. परंतु, याच वेळी श्वीऑनटेकने रॅकेट बदलण्याचा निर्णय घेतला. याचा सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला होता. श्वीऑनटेकला हा गुण मिळवण्यात अपयश आले आणि नंतर सेटमध्येही बरोबरी झाल्यामुळे टायब्रेकर घेण्यात आला.

टायब्रेकरमध्ये जाबेऊरने खेळ उंचावला.

# ऑस्ट्रेलियाचे निर्भेळ यश!

### तिसऱ्या सामन्यात न्यूझीलंडवर 25 धावांनी सरशी; स्मिथचे शतक

**।केर्न्स (ऑस्ट्रेलिया) । महाईन्यूज ।**



फलंदाज म्हणून अपयश आल्यानंतरही कर्णधार म्हणून आरोन फिंचची एकदिवसीय कारकीर्दीची सांगता न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेतील ३-० अशा एकतर्फी यशाने झाली. स्टीव्ह स्मिथने (१३१ चेंडूंत १०५ धावा) केलेल्या शतकी खेळीमुळे ऑस्ट्रेलियाने रविवारी तिसऱ्या आणि अखेरच्या एकदिवसीय सामन्यात न्यूझीलंडवर २५ धावांनी विजय मिळवला.

या सामन्यात ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करताना ५ बाद २६७ धावा केल्या. त्यांच्या डावाची अडखळती सुरुवात झाली. कारकीर्दीतील अखेरचा एकदिवसीय सामना खेळणारा फिंच केवळ पाच धावा करून बाद झाला. तसेच जोश इंग्लिस १० धावांवर माघारी परतला. यानंतर स्मिथने मार्नस लबूशेनच्या (७८ चेंडूंत ५२) साथीने ऑस्ट्रेलियाचा डाव सावरला. स्मिथने एकदिवसीय कारकीर्दीतील १२वे आणि जवळपास दोन वर्षांत पहिले आंतरराष्ट्रीय शतक ठरले. त्यानंतर २६८ धावांचा पाठलाग करणाऱ्या न्यूझीलंडचा प्रतिकार ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजांनी मोडून काढला. ग्लेन फिलिप्स (४७), जिमी नीशाम (३६) आणि मिचेल सँटनर (३०) यांनी अखेरीस काहीशी झुंज दिली. मात्र, न्यूझीलंडचा डाव २४२ धावांत आटोपला. ऑस्ट्रेलियाकडून मिचेल स्टार्कने सर्वाधिक तीन गडी बाद केले.

**संक्षिप्त धावफलक**

ऑस्ट्रेलिया : ५० षटकांत ५ बाद २६७ (स्टीव्ह स्मिथ १०५, मार्नस लबूशेन ५२, ॲलेक्स कॅरी ४२; ट्रेंट बोल्ट २/२५) विजयी वि. न्यूझीलंड : ४९.५ षटकांत सर्वबाद २४२ (ग्लेन फिलिप्स ४७, जेम्स नीशाम ३६; मिशेल स्टार्क ३/६०, कॅमेरुन ग्रीन २/२५)

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
96577 67000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही